# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.०८/०७/२०२५

### जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८/०७/२०२५ ते १२/०७/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| पाऊस (मिमी) | 18 | 10 | 3 | 2 | 3 |
| कमाल तापमान (अं.से.) | 28 | 28 | 31 | 32 | 32 |
| किमान तापमान (अं.से.) | 23 | 23 | 23 | 24 | 24 |
| ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 95 | 96 | 93 | 93 | 95 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 92 | 93 | 92 | 92 | 91 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 11 | 11 | 11 | 12 | 13 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 255 | 258 | 264 | 261 | 251 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०८ व ०९ जुलै, २०२५ रोजी काही (जिल्ह्याच्या सुमारे २६–५० %) ठिकाणी तर १०, ११ व १२ जुलै, २०२५ रोजी तुरळक (जिल्ह्याच्या सुमारे ०–२५ %) ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक ०८ जुलै, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक ०९ जुलै, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजासह पाऊस पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०७ ते १९ जुलै, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने फळ बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>• जिल्ह्यातील ज्या भागात १०० मिमी पेक्षा जास्त पाऊस झाला असेल (भुसावळ, एरोंडोल, चोपडा, पारोळा, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा, भडगाव, बोधवड) व जमिनीत पुरेशी ओल आहे व उपलब्ध पाण्याचा साठा आहे तिथे वापसा आल्यावर खरीप पिकांची पेरणी करण्यास हरकत नाही अन्यथा पेरणीची घाई करू नये.<br>• ज्या भागात पेरणी झालेली आहे आणि सध्या पावसाचा खंड आहे तिथे जमिनीतील बाष्पिभवन रोखण्यासाठी आणि जमिनीतील भेगा बुजवण्यासाठी कोळपणी करण्यात यावी.<br>• पावसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी व खत करण्यासाठी वापरावे. पावसानंतर शेतातील उभ्या पिकाची पड झाली असल्यास पीक बांधणी करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून, जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी, हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानाचा पूर्वानुमाना करिता |

| | | |
|---|---|---|
| | | मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पाण्याचे पूर्नभरण : पाणी जमिनीत जास्तीत जास्त मुरेल व वाहून जाणार नाही यासाठी प्रयत्न करावा. पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर विहिर पुर्नभरण किंवा बोअरवेल पूर्नभरण करण्यासाठी वापरावे.<br>• शेतकरी बांधवांनी कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी. |
| **खरीप पिक नियोजन** | | वापसा आल्यानंतर कुळवाने मशागत करावी म्हणजे उगवलेल्या तणांचा बंदोबस्त होईल व शेत पेरणी योग्य होईल. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. पिकाच्या आवश्यकतेनुसार जमिनीची निवड व पीक निहाय पूर्व मशागतीची कामे पूर्ण करावी. पेरणी पूर्वी पिकानुसार योग्य बीजप्रक्रिया करावी व जैविक खतांचा आवश्यक्तेनुसार वापर करावा. |
| **सोयाबीन** | पेरणीपूर्व | वाणांची निवड: फुले दूर्वा, फुले किमया, फुले संगम, फुले अग्रणी, फुले कल्याणी<br>बीजप्रक्रिया: जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास कार्बोक्झीन ३७.५%+थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे त्यानंतर ॲझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली किंवा थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी त्यामुळे खोड माशी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल. |
| **कापूस** | पेरणीपूर्व | वाणांची निवड: फुले ६८८, फुले यमुना, फुले रखूमाई, फुले ४९२, फुले तरंग, फुले अस्मिता, फुले श्वेतांबरी, फुले सुमन, फुले ३८८, फुले धारा, फुले प्रभा, फुले चेतना, फुले माही, फुले एकता, फुले शुभ्रा<br>बीजप्रक्रिया: अप्रमाणित बियाण्यास कार्बाक्झिन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू एस बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३.५ ग्रॅम या प्रमाणात करावी. त्यामुळे मुळकुज, जीवाणूजन्य करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| **मका** | पेरणीपूर्व | वाणांची निवड: राजर्षी, फुले महर्षी, संगम, कुबेर<br>बीजप्रक्रिया: पेरणीपुर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम हे बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच अझोटोबक्टर जीवाणु संवर्धन २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी.<br>पीक उगवत असताना कोवळे कोंब पक्षी उचलतात म्हणून पेरणीनंतर सुरवातीच्या १०-१२ दिवसांपर्यंत पक्ष्यांपासून संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मका पेरणीनंतर सुरवातीच्या २० दिवसांपर्यंतच्या कालावधीत पिकात जास्त पाणी किंवा दलदलीची स्थिती असल्यास कोवळी रोपे पिवळी पडून मरतात. कारण मक्या ची रोपावस्था या स्थितीस खूपच संवेदनशील आहे. म्हणून पेरणीनंतरच्या सुरवातीच्या २० दिवसांपर्यंतच्या काळात पिकात पाणी साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चाऱ्यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| **भाजीपाला पीके** | | खरीप हंगामातील भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्ट्यांच्या सहाय्याने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>केळी लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातीवंत बागेतूनच निवडावे. कंद ३ ते ४ महिने वयाचे , ४५० ते ७५० ग्रॅ. वजनाचे आणि उभट किंवा नारळाच्या आकाराचे असावेत. कंदावर ३- ४ रिंगा ठेवून खालील बाजूने वरचेवर कंद तासून घ्यावा. कंद लागवडीपूर्वी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डझिम या द्रावणात कंद ३० ते ४० मिनीटे बुडवावीत.<br>उती संवर्धित रोपे लागवडीसाठी जातीवंत वाणांची , विषाणू निर्देशांक तपासलेली निरोगी रोपे खात्रीशीर उत्पादकांकडून खरेदी करावीत. उतिसंवर्धित रोपे एक सारख्या वाढीचे , ३० ते ४५ सेमी उंचीचे आणि किमान ६ ते ७ पाने असलेली योग्य कठिणता संस्कार केलेली रोपे निवडावीत. |
| **जनावरांचे** | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे |

| | | |
|---|---|---|
| व्यवस्थापन | | जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा. जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून, आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड ( **Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲपच्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी, गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे, योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे, फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :-
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : ०८.०७.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**